साधु ह्मणतो, हे राजन्, भक्तियुक्त अंतःकरणानें हें कोणाचें पूजन करीत आहां तें मला सांगाल अशी मी इच्छा करीत आहें ॥ ६ ॥ असें साधूचें भाषण ऐकून राजा ह्मणतो अतुल ज्याचें तेज असा जो भगवान् विष्णु त्याचें पूजन करितों, आणि पुत्रादिक प्राप्त व्हावे या इच्छेनें स्वजनांसहवर्तमान व्रत करितों ॥ ७ ॥ असें राजाचें भाषण ऐकून पुन्हां साधू आदरपूर्वक ह्मणतो कीं, हे राजन्, सर्व

साधुरुवाच ॥ किमिदंकुरुषेराजन्भक्तियुक्तेनचेतसा प्रकाशंकुरुतत्सर्वंश्रोतुमिच्छामिसांप्रतं ॥ ६ ॥ राजोवाच ॥ पूजनंक्रियतेसाधोविष्णोरतुलतेजसः॥ व्रतंचस्वजनैः सार्धंपुत्राद्यावाप्तिकाम्यया ॥ ७ ॥ भूपस्यवचनं श्रुत्वात्वासाधुः प्रोवाचसादरं ॥ सर्वंकथयमेराजनकरिष्येहंतवोदितम् ॥ ८ ॥ ममापिसंततिर्नास्तिएतस्माज्जायतेध्रुवम् ॥ ततोनिवृत्यवाणिज्यात्सानंदोगृहमागतः ॥ ९ ॥

प्रकार या व्रताचा मला विस्तारपूर्वक सांगा, जसें सांगाल त्याप्रमाणें मी करीन ॥ ८ ॥ कारण मलाही संतती नाहीं, निश्चयपूर्वक या व्रतेंकरून होईल तर सांगा. नंतर राजापासून व्रतविधी श्रवण करून वाणिज्यापासून माघारीं फिरोन आनंदानें गृहाप्रत जाता जाहला ॥ ९ ॥

नंतर या व्रतापासून संतती प्राप्त होते असें स्त्रियेला सांगून ह्मणतो कीं, मला जेव्हां संतति होईल त्या काळीं मी व्रत करीन ॥ १० ॥ असें आपली लीलावती जी स्त्री तिला सांगितल्या नंतर कोणे एके दिवशीं त्याची स्त्री साध्वी लीलावती ॥ ११ ॥ ही आनंदयुक्तचित्तानें पतीशीं धर्म परायण असतां सत्यदेवाचे प्रसादेंकरून गर्भिणी राहती जाहली ॥ १२ ॥ नंतर नऊ मास पूर्ण होऊन दहाव्या

भार्यायैकथितंसर्वंव्रतंसंततिदायकम् ॥ तदाव्रतंकरिष्यामियदामेसंततिर्भवेत् ॥ १० ॥ इतिलीलावतींप्राहप्रत्नींसाधुःससत्तमः ॥ एकस्मिन्दिवसेतस्यभार्या लीलावतीसती ॥ ११ ॥ भर्तृयुक्तानंदचित्ताऽभवद्धर्मपरायणा गर्भिणीसाभवत्तस्यभार्यासत्यप्रसादतः ॥ १२ ॥ दशमेमासिवैतस्याःकन्यारत्नमजायत ॥ दिनेदिनेसाववृधेशुक्लपक्षेयथाशशी ॥ १३ ॥ नाम्नाकलावतीचेतितन्नामकरणंकृतं ततोलीलावतीप्राहस्वामिनंमधुरंवचः ॥ १४ ॥

उत्पन्न जाहली, [illegible] कन्या होऊन जसा शुक्लपक्षी चंद्र वृद्धिंगत होतो तशी ती कन्या वृद्धिंगत होऊं जेथें तो साधुवाणी उतरली [illegible] करून कलावती असें नाम ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं लीलावती मोठ्या आनंदानें जेरवंद केले ॥ २८ ॥ ॥ १४ ॥

साधु ह्मणतो, हे राजन्, भक्तियुक्त अंतःगातां करीत का नाहीं ? तेव्हां साधु ह्मणतो, हे स्त्रिये, हिचा अशी मी इच्छा करीत आहें ॥ ६ ॥ ॥ १५ ॥ असें भार्येला सांगून नगराप्रत जाता जाहला. नंतर जो भगवान् विष्णु त्यांचे ठायीं वृद्धिंगत होऊं लागली ॥ १६ ॥ तेव्हां साधु त्या कन्येला पाहून व्रत करितों असें वर्तमान विचार करून नगरामध्यें दूत पाठविता जाहला ॥ १७ ॥ कन्येला उत्तम

नकरोषिकिमर्थंवैपुरासंकल्पितंव्रतम् ॥ साधुरुवाच ॥ विवाहसमये अस्याः करिष्यामिव्रतंप्रिये ॥ १५ ॥ इतिभार्यांसमाश्वास्यजगामनगरंप्रति ॥ ततः कलावतीकन्याववृधेपितृवेश्मनि ॥ १६ ॥ दृष्ट्वाकन्यांततःसाधुर्नगरेसखिभिः सह ॥ मंत्रयित्वाद्भुतंदूतंप्रेषयामासधर्मवित् ॥ १७ ॥ विवाहार्थंचकन्यायावरं श्रेष्ठंविचारय ॥ तेनाज्ञप्तश्चदूतोऽसौकांचनंनगरंययौ ॥ १८ ॥ तस्मादेकंवणिक्पुत्रंसमादायागतोहिसः ॥दृष्ट्वातुसुंदरंबालंवणिक्पुत्रंगुणान्वितम् ॥ १९ ॥

प्रकारचा श्रेष्ठ वर पाहावा अशी साधूची आज्ञा होतांच तो दूत कांचननगराचे ठाईं जाता जाहला. ॥ १८ ॥ तेथें एक वैश्यपुत्र सर्व गुणांनीं युक्त व सुंदर असा पाहून तो दूत त्याला घेऊन प्राप्त जहाला ॥ १९ ॥

नंतर साधु वैश्य आपले ज्ञाति व बांधवसहवर्तमान संतुष्ट अंतःकरणानें त्या वैश्यपुत्राला यथाशास्त्र विधी करून कन्या देता जाहला ॥ २० ॥ परंतु दुर्दैवेंकरून त्याला कन्येच्या विवाहकालाचे समयीं व्रत करण्याची विस्मृति जाहली, तेणेंकरून भगवान् प्रभु रुष्ट जाहला ॥ २१ ॥ नंतर कांहीं दिवसांनीं स्वकीयव्यापारकर्माविषयीं निपुण असा तो साधु व्यापार करण्याकरितां जामातासहवर्तमान निघाला

ज्ञातिभिर्बंधुभिःसार्धंपरितुष्टेनचेतसा ॥ दत्तवान्सधुःपुत्रायकन्यांविधिविधानतः ॥ २० ॥ ततोभाग्यवशात्तेनविस्मृतंव्रतमुत्तमम् ॥ विवाहसमयेतस्यास्तेनरुष्टोऽभवत्प्रभुः ॥ २१ ॥ ततःकालेननियतोनिजकर्मविशारदः ॥ वाणिज्यार्थंगतःशीघ्रंजामातृसहितोवणिक् ॥ २२ ॥ रत्नसारपुरेरम्येगत्वासिंधुसमिपतः वाणिज्यमकरोत्साधुर्जामात्राश्रीमतासह ॥ २३ ॥ तौगतौनगरेरम्येचंद्रकेतोर्नृपस्यच ॥ एतस्मिन्नेवकालेतुसत्यनारायणप्रभुः ॥ २४ ॥

॥ २२ ॥ तो समुद्रकिनारीं सुंदर असें जें रत्नसारपूर नगर त्यामध्यें जामातासहवर्तमान व्यापार करण्यास आरंभ करिता जाहला ॥ २३ ॥ चंद्रकेतु राजाच्या नगरांत उभयतां येऊन व्यापार करितात असें सत्यनारायण प्रभु यांनीं पाहिलें ॥

असें पाहून भगवंतानीं विचार केला कीं हा साधु मिथ्याभाषण करणारा आहे, आणि त्याबरोबर शाप दिला तो काय? तुला दारुण व कठीण महदुःख प्राप्त होईल ॥ २५ ॥ असा शाप दिल्यानंतर एके दिवशीं राजाचे येथें चोर येऊन द्रव्य घेऊन जेथें साधु वाणी जामातासहवर्तमान उतरला होता तेथें तो चोर प्राप्त जाहला ॥ २६ ॥ आणि आपल्यामागून दूत धांवत येतात असें पाहून भीति

भ्रष्टप्रतिज्ञमालोक्यशापंतस्मैप्रदत्तवान् ॥दारुणंकठिनंचास्यमहद्दुःखंभविष्यति ॥ २५ ॥ एकस्मिन्दिवसेराज्ञोधनमादायतस्करः ॥ तत्रैवचागतश्चरोरोवणिजौ यत्रसंस्थितौ ॥ २६ ॥ तत्पश्चाद्धावकान्दूतान्दृष्ट्वाभीतेनचेतसा ॥ धनंसंस्थाप्य तत्रैवसतुशीघ्रमलक्षितः ॥ २७ ॥ ततोदूताःसमायातायत्रास्तेसज्जनोवणिक् ॥ दृष्ट्वानृपधनंतत्रबध्वादूतावणिक्सुतौ ॥ २८ ॥

उत्पन्न जाहली, तेव्हां धन तेथें ठेऊन तो तस्कर दृष्टि चुकवून पळून गेला ॥ २७ ॥ नंतर ते राजदूत जेथें तो साधुवाणी उतरला होता तेथें प्राप्त जाहले आणि राजद्रव्य हेंच आहे असें पाहून उभयतांला मोठ्या आनंदानें जेरबंद केले ॥ २८ ॥

आणि हर्षानें राजाजवळ धांवत येऊन ह्मणतात कीं, हे प्रभो, हे दोन चोर आणिले आहेत तर यांला पाहून कायती अज्ञा व्हावी ॥२९॥नंतर राजानें त्यांला पाहून, विचार न करितां तत्काल आज्ञा केली कीं, यांला दृढ बंधन करून कारागृहांत ठेवावें॥३०॥साधुवाण्यानें आह्मी चोर नाहीं अशो प्रार्थना केली परंतु सत्यदेवाचे मायेकरून त्याचें वचन सत्य न मानून चंद्रकेतु राजानें आपलें द्रव्य घेऊन साधूचेंही

हर्षेणधावमानाश्चऊचुर्नृपसमीपतः ॥ तस्करोद्वौसमानीतौविलोक्याऽऽज्ञापय प्रभो ॥२९॥ राज्ञाज्ञप्तास्ततःशीघ्रंदृढंबध्वातुतावुभौ॥स्थापितौद्वौमहादुर्गेकारागारेऽविचारतः ॥ ३० ॥ माययासत्यदेवस्यनश्रुतंकैस्तयोर्वचः ॥ अतस्तयोर्धनंराज्ञागृहीतंचंद्रकेतुना ॥ ३१ ॥ तच्छापाच्चगृहेतस्यभार्याचैवातिदुःखिता ॥ चोरेणापिहृतंसर्वंगृहेयच्चस्थितंधनं॥३२॥आधिव्याधिसमायुक्ताक्षुत्पिपासातिदुःखिता ॥ अन्नचिंतापराभूत्वाबभ्रामचगृहेगृहे ॥ ३३ ॥

द्रव्य हरण केलें ॥३१॥ भगवंताचे शापें करून गृहाचे ठाईं साधूची स्त्रीही दुःखित जाहली. कारण गृहामध्यें जें द्रव्य होतें तेंही सर्व चोरांनीं हरण केलें॥३२॥आणि अनेक प्रकारचे आधि व व्याधी उत्पन्न जाहले. क्षुधेतृषेनें व्याप्त होऊन अन्नाची भ्रांती जाहली तेव्हां घरोघर फिरूं लागली ॥ ३३ ॥

कलावती कन्याही नित्यशः घरोघर फिरे. कोणे एके दिवशीं क्षुधेनें पीडित होऊन एका ब्राह्मणाचे घरीं गेली. तेथें सत्यनारायणाचें व्रत ब्राह्मण करीत आहे असें पाहिलें. ॥ ३४ ॥ नंतर तेथें बसून कथा श्रवण करून त्याची प्रार्थना केली आणि प्रसाद भक्षण करून रात्रीं आपल्या गृहाप्रत प्राप्त होती जाहली ॥ ३५ ॥ नंतर माता कलावती कन्येप्रत प्रेमभावानें विचारत्ये कीं, हे

कलावतीतुकन्यापिबभ्राप्रतिवासरम् ॥ ॥ एकस्मिन्दिवसेजाताक्षुधार्ताद्विजमंदिरम्गत्वापश्यद्व्रतंसत्यनारायणस्यच ॥ ३४ ॥ उपविश्यकथांश्रुत्वावरंप्रार्थितवत्यपि ॥ प्रसादभक्षणंकृत्वाययौरात्रौगृहंप्रति ॥ ३५॥ माताकलवतींकन्यापप्रच्छप्रेमभावतः ॥ पुत्रिरात्रौस्थिताकुत्रकिंतेमनसिवर्तते ॥ ३६ ॥ कन्याकलावतीप्राहमातरंप्रतिसत्वरं ॥ द्विजालयेव्रतंमातर्दृष्टंवांछितसिद्धिदम् ॥ ३७॥

कन्ये, तूं इतकी रात्रपर्यंत कोठें होतीस आणि तुझे मनांत काय आहे ? ॥ ३६ ॥ असें विचारितांच कलावती कन्या ह्मणते, हे माते, आज ब्राह्मणाचे येथें व्रत पाहिलें. तें कसें आहे ? दृढ वांछितसिद्धी देणारें आहे ॥ ३७ ॥

असें कन्येचें भाषण श्रवण करून व्रत आपणही करावें असें मनांत आणून नंतर साधुवाण्याची स्त्री आनंदानें सत्यनारायणाचें॥३८॥व्रत आपले स्वजाति बांधवांसहवर्तमान करिती जाहली आणि प्रार्थना केली कीं, आपल्या घरीं भर्ता आणि जामात लवकर यावे ही इच्छा आहे ॥ ३९ ॥ अशी प्रार्थना करून म्हणाली कीं, हे भगवान्, माझे भर्त्याचे व जामाताचे जे अपराध असतील ते तूं क्षमा करण्यास

तच्छ्रुत्वाकन्यकावाक्यंव्रतंकर्तुंसमुद्यता ॥ सामुदातुवणिग्भार्यासत्यनारायणस्यच॥ ३८ ॥व्रतंचक्रेसैवसाध्वीबंधुभिःस्वजनैःसह ॥ भर्तृजामातरौक्षिप्रमागच्छेतांस्वमाश्रमं ॥ ३९ ॥ अपराधंचमेभर्तुर्जामातुःक्षंतुमर्हसि॥इतिदिव्यंवरंवव्रे सत्यदेवंपुनःपुनः॥व्रतेनानेनतुष्टोऽसौसत्यनारायणप्रभुः॥ ४० ॥दर्शयामासहिस्वप्नंचंद्रकेतुंनृपोत्तमं ॥ बंदिनौमोचयप्रातर्वणिजौनृपसत्तम ॥ ४१ ॥

समर्थ आहेस, याप्रमाणें वारंवार प्रार्थना केली नंतर त्या व्रताच्या योगानें सत्यनारायण प्रभु संतुष्ट होऊन ॥ ४० ॥ चंद्रकेतु राजाचे स्वप्नामध्यें जाऊन सांगितसें कीं, हे नृपसत्तम, प्रातःकालीं तूं आपल्या बंदीखान्यांतून साधु वैश्याला मुक्त कर ॥ ४१ ॥

आणि जें द्रव्य तूं त्याचें ग्रहण केलें आहेस तें सर्व त्याचें परत दे, नाहीं पेक्षां तुझें राज्यधन पुत्र यांचा सर्व नाश करीन ॥ ४२ ॥ असें राजाचे स्वप्नांत सांगून भगवान् अंतर्धाम पावते जाहले. नंतर प्रातःकालीं राजा आपल्याप्रधानांसहवर्तमान ॥ ४३ ॥ सभेमध्यें स्थित होऊन रात्रीचें स्वप्न सर्व लोकांना विदित करून बंदींत टाकलेले जे महाजन वणिक्पुत्र त्यांला लवकर मुक्त करण्याची

देयंधनंचतत्सर्वंगृहीतंयत्त्वयाधुना ॥ नोचेत्त्वांनाशयिष्यामिसराज्यधनपुत्रकं ॥ ४२ ॥ एवमाभाष्यराजानंध्यानगम्योभवत्प्रभुः ॥ ततःप्रभातसमयेराजाच स्वजनैः सह ॥ ४३ ॥ उपविश्यसभामध्येप्राहस्वप्नंजनंप्रति ॥ बद्धौमहाजनौ शीघ्रंमोचयद्वौवणिक्सुतौ ॥ ४४ ॥ इतिराज्ञोवचः श्रुत्वामोचयित्वामहाजनौ॥ समानीयनृपस्याग्रेप्राहुस्तेविनयान्विताः ॥ ४५ ॥

आज्ञा करिता जहाला ॥ ४४ ॥ असें राजाचें भाषण श्रवण करून दूतांनीं त्या दोघांस मुक्त करून राजाचे समोर आणिलें आणि नम्र होऊन राजास ह्मणतात कीं, ॥४५॥

हे राजा, ते दोघे वैश्यपुत्र बंदीखान्यांतून मुक्त करून आणले आहेत. असें दूतांनीं सांगितल्यानंतर साधुवैश्य व त्याचा जामात यांनीं चंद्रकेतु राजाला नमस्कार करून ॥ ४६ ॥ आपला पूर्ववृत्तांत स्मरण करून, भीतीच्या योगानें कांहींच भाषण केलें नाहीं. तेव्हां राजा त्या उभयतांला पाहून आदरपूर्वक भाषण करिता जाहला ॥ ४७ ॥ राजा ह्मणतो कीं, दैवयोगानें आजपर्यंत तुह्मांला दुःख

आनीतौद्वौवणिक्पुत्रौमुक्तौनिगडबंधनात् ॥ ततोमहाजनौनत्वाचंद्रकेतुंनृपोत्तमम् ॥ ४६ ॥ स्मरंतौपूर्ववृत्तांतंनोचतुर्भयविव्हलौ ॥ राजावणिक्सुतौवीक्ष्यवचःप्रोवाचसादरम् ॥ ४७ ॥ दैवात्प्राप्तंमहदुःखमिदानींनास्तिवैभयम् ॥ तदानिगडसंत्यागंक्षौरकर्माद्यकारयत् ॥ ४८ ॥ वस्त्रालंकारकंदत्वापरितोष्यनृपश्चतौ ॥ पुरस्कृत्यवणिक्पुत्रौवचसातोषयद्भृशम् ॥ ४९ ॥

प्राप्त जाहलें. आतां भीति नाहीं असें ह्मणून तत्काल शृंखलाबंधनापासून मुक्त करून क्षौरकर्मादिक करविता जाहला ॥ ४८ ॥ नंतर वस्त्र अलंकार देऊन त्यांस राजा संतुष्ट करून, पुनः आदरयुक्त भाषणानें बहुत संतुष्ट करिता जाहला ॥ ४९ ॥

नंतर पूर्वी राजानें साधूचें जें द्रव्य आणिलें होतें त्याच्या दुप्पट देऊन सांगितलें कीं, हे साधो आतां तूं आपल्या गृहाप्रत जावें ॥ ५० ॥ अशी राजाची आज्ञा होतांच साधू राजाला वंदन करून ह्मणाला कीं, हे राजा, आतां तुझ्या प्रसादेंकरून मीं आपल्या गृहाला जातों ॥ ५१ ॥ इति श्रीस्कंदपुराणेरेवा खंडे सत्यनारायणकथायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ सूत म्हणतात, हे ऋषीहो, राजाज्ञा घेऊन निघाला

पुरानीतंतुयद्रव्यंद्विगुणीकृत्यदत्तवान् ॥ प्रोवाचतौततोराजागच्छसाधोनिजा श्रमम् ॥ ५० ॥ राजानंप्रणिपत्याहगंतव्यंत्वत्प्रसादतः ॥ ५१ ॥ इतिश्रीस्कंद पुराणेरेवाखंडेसत्यनारायणकथायांतृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ सूतउवाच ॥ यात्रांतुकृतवान्साधुर्मंगलायनपूर्विकाम् ॥ ब्राह्मणायधनंदत्त्वातदातुनगरं ययौ ॥ १ ॥ कियद्दूरेगतेसाधौसत्यनारायणप्रभुः ॥ जिज्ञासांकृतवान्साधोकि मस्तितवनौस्थितम् ॥ २ ॥

आणि मंगलपूर्वक साधु सर्व यात्रा करून ब्राह्मणाला कांहीं द्रव्य देऊन नंतर आपल्या नगराप्रत जाण्यास निघाला ॥ १ ॥ तो साधुवाणी नौकेंत द्रव्य भरून कांहीं दूर गेल्यावर, सत्यनारायण प्रभु त्याची परीक्षा पहावी हें मनांत आणून विचारिलें कीं, हे साधो तुझ्या नौकेंत काय आहे? ॥ २ ॥

असें भगवंतानें संन्याशाचें रूप धारण करून विचारिलें, तेव्हां ते महाजन उन्मत्तपणानें हेलनापूर्वक हास्य करून ह्मणतात, हे दंडिन्, तूं कशाकरितां विचारितोस ? तुझ्या मनांत द्रव्य हरण करण्याची इच्छा आहे काय ? ॥ ३ ॥ माझे नौकेंत लतापत्रादिक आहेत असें साधुवाण्याचें निष्ठुर भाषण श्रवण करून यती ह्मणाला कीं, तुझें वचन सत्य होवो ? ॥ ४ ॥ याप्रकारें भाषण करून तो यती, साधुवा-

ततोमहाजनौमत्तौहेलयाचप्रहस्यवै ॥ कथंपृच्छसिभोदंडिन्मुद्रांनेतुंकिमिच्छसि ॥ ३ ॥ लतापत्रादिकंचैववर्त्ततेतरणौमम ॥ निष्ठुरंचवचःश्रुत्वासत्यंभवतुते वचः ॥ ४ ॥ एवमुक्त्वागतःशीघ्रंदंडीतस्यसमीपतः ॥ कियद्दूरेततोगत्वास्थितः सिंधुसमीपतः ॥ ५ ॥ गतेदंडिनिसाधुश्चकृतनित्यक्रियस्तदा ॥ उत्थितांतरणीं दृष्ट्वाविस्मयंपरमंययौ ॥ ६ ॥

ण्यापासून शीघ्र गमन करून कांहींसा दूर जाऊन समुद्रतीरीं स्वस्थ राहिला ॥ ५ ॥ साधुवाणी सन्याशी गेल्यानंतर आपलें नित्यकर्म करून पाहतो तर नाव हलकी दिसली. हें अवलोकन करून त्याला परम आश्चर्य वाटलें ॥ ६ ॥

आणि नावेंत सर्व लतावेली इत्यादिक पाहून तत्काल मूर्छा येऊन भूमीवर पडला. नंतर कांहीं वेळानें साधुवाणी, सावध होऊन चिंतायुक्त होता जाहला ॥ ७ ॥ त्या कालीं जामात साधूला ह्मणतो कीं आतां शोक कशाकरितां करितोस ? त्या सन्याशानें शाप दिला आहे ॥ ८ ॥ त्या संन्याशाच्या वचनेंकरून असें होईल यांत संशय नाहीं, याकरितां आपण त्यालाच शरण जाऊं ह्मणजे आपला

दृष्ट्वालतादिकंचैवमूर्छितोन्यपतद्भुवि ॥ लब्धसंज्ञोवणिक्पुत्रस्ततश्चिंतान्वितोऽभवत् ॥ ७ ॥ तदातुदुहितुःकांतोवचनंचेदमब्रवीत् ॥ किमर्थंक्रियतेशोकःशापोदत्तश्चदंडिना ॥ ८ ॥ शक्यतेऽनेनसर्वंहिकर्तुंचात्रनसंशयः ॥ अतस्तच्छरणंयामोवांछितार्थोभविष्यति ॥ ९ ॥ जामातुर्ववचनंश्रुत्वातत्सकाशंगतस्तदा ॥ दृष्ट्वाचदंडिनंभक्त्यानत्वाप्रोवाचसादरम् ॥ १० ॥क्षमस्वचापराधंमेयदुक्तंतवसंनिधौ ॥ एवंपुनःपुनर्नत्वामहाशोकाकुलोऽभवत् ॥ ११ ॥

वांछित अर्थ सिद्ध होईल ॥ ९ ॥ असें जामाताचें भाषण श्रवण करून तत्काल त्याचे समीप प्राप्त जाहले नंतर त्याला पाहून भक्तीनें नमस्कार करून आदरपूर्वक भाषण करिता जाहला ॥ १० ॥ जें मीं तुजपाशीं भाषण मिथ्या केलें हा माझा अपराध क्षमा करावा, असें वारंवार ह्मणून हात जोडून महान् शोकानें व्याकुल होता जाहला ॥ ११ ॥

नंतर तो दंडी साधुवाणी विलाप करितो हें पाहून ह्मणाला कीं, तूं रुदन करूं नकोस; माझें वचन श्रवण कर, तूं माझ्या पूजनाच्या बहिर्मुख जाहलास ॥ १२ ॥ आणि हे दुष्टबुद्धे, आजपर्यंत वारंवार दुःखें भोगलींस तीं माझे आज्ञेकरूनच जाहलीं असें भगवंताचें वचन श्रवण करून साधुवाणी स्तवन करूं लागला ॥ १३ ॥ साधु म्हणतो, ब्रम्हादिदेव सर्व तुझे मायेकरून मोहित होत्साते तुझे गुण व

प्रोवाचवचनंदंडीविलपंतंविलोक्यच ॥ मारोदीःशृणुमद्वाक्यंममपूजाबहिर्मुख ॥ १२ ॥ ममाज्ञयाचदुर्बुद्धेलब्धंदुःखंमुहुर्मुहुः ॥ तच्छ्रुत्वाभगद्वाक्यंस्तुतिंकर्तुं समुद्यतः ॥ १३ ॥ साधुरुवाच ॥ त्वन्मायामोहिताःसर्वेब्रह्माद्यास्त्रिदिवौकसः ॥ नजानंतिगुणानूनंतवाश्चर्यमिदंप्रभो ॥ १४ ॥ मूढोहंत्वांकथंजानेमोतस्तवमायया ॥ प्रसीदपूजयिष्यामियथाविभवविस्तरैः ॥ १५ ॥

रूप जाणत नाहींत हें मोठें आश्चर्य ॥ १४ ॥ मी तर मूर्ख आणि तुझ्या मायेकरून मोहित तस्मात् तुला कसा जाणेन ? तर आतां मजवर प्रसन्न हो म्हणजें मी ऐश्वर्यानुरूप तुझें पूजन करीन ॥ १५ ॥

पूर्वीं द्रव्य असून मिथ्या बोललों तर हा माझा अपराध क्षमा करावा, मीं शरण आलों आहें, माझें रक्षण कर, असें भक्तियुक्त साधूचें वचन श्रवण करून भगवान् प्रसन्न जाहले ॥ १६ ॥ आणि वांछित वर देऊन भगवान् तेथेंच गुप्त जाहले. नंतर साधुवाणी नौकेवर चढून पाहतो तों ती द्रव्यानें भरली आहे ॥ १७ ॥ असें पाहून आश्चर्य वाटलें आणि म्हणतो कीं सत्यदेवाच्या कृपेकरून माझें वांछित

पुरावित्तंचतत्सर्वंत्राहिमांशरणागतं ॥ श्रुत्वाभक्तियुतंवाक्यंपरितुष्टोजनार्दनः ॥ १६ ॥ वरंवाछितंदत्वातत्रैवांतर्दधेहरिः ॥ ततोनावंसमारुह्यदृष्ट्वावित्तप्रपूरितां ॥ १७ ॥ कृपयासत्यदेवस्यसफलंवांछितंमम ॥ इत्युक्त्वास्वजनैःसार्धंपूजांकृत्वायथाविधि ॥ १८ ॥ हर्षेणचाभवत्पूर्णःसत्यदेवप्रसादतः ॥ नावंसंयोज्ययत्नेनस्वदेशगमनंकृतम् ॥ १९ ॥

सफल जाहलें, इतकें बोलून आपल्या स्वजनासहवर्तमान यथाशास्त्र नारायणाचें पूजन केलें ॥ १८ ॥ नंतर सत्यदेवाचे प्रसादानें आनंदानें पूर्ण होत्साता नौकेची योजना करून आपल्या देशाप्रत गमन करिता जाहला ॥ १९ ॥

नावेंत बसून कांहीं दूर गेल्यावर साधुवैश्य जांवयाला ह्मणतो, ही माझी रत्नपुरी नगरी आली पहा, असें बोलून आपला वित्तरक्षक दूत घरीं वर्तमान सांगण्याकरितां पाठविता जाहला ॥ २० ॥ तो दूत साधूचे आज्ञेनें नगरामध्यें गेला आणि साधुवाण्याचे स्त्रियेला पाहून हात जोडून नमस्कार केला आणि

साधुर्जामातरंप्राहपश्यरत्नपुरींमम ॥ दूतंचप्रेषयामासनिजवित्तस्यरक्षकं॥२०॥
दूतोऽसौनगरंगत्वासाधुभार्यांविलोक्यच ॥ प्रोवाचवांछितंवाक्यंनत्वाबद्धांज
लिस्तदा ॥ २१ निकटेनगरस्यैवजामात्रासहितोवणिक् ॥ आगतोबंधुवर्गैश्च
वित्तैश्चबहुभिर्युतः ॥ २२ ॥ श्रुत्वादूतमुखाद्वाक्यं महाहर्षतीसती ॥ सत्यपूजा
ततःकृत्वाप्रोवाचतनुजांप्रति ॥ २३ ॥

भाषण करिता जाहला ॥ २१ ॥ दूत ह्मणतो साधु जामात सहवर्तमान बहुत द्रव्य घेऊन बंधुवर्गासहित नगराच्या जवळ प्राप्त जाहला आहे ॥ २२ ॥ असें दूताचे मुखांतून वचन श्रवण करून तिला मोठा हर्ष जहाला. नंतर सत्यनारायणाची पूजा करून कन्येप्रत सांगती जाहली ॥ २३ ॥

कीं मीं पतिदर्शनार्थ लवकर जात्यें तूंही लवकर ये असें मातेचें वचन श्रवण करून तत्काल तें व्रत समाप्त केलें ॥ २४ ॥ परंतु प्रसाद भक्षण न करितां कलावतीही पतिदर्शनार्थ गेली, तेणेंकरून सत्यदेव रुष्ट जाहला आणि तिचा भर्ता व नौका ॥ २५ ॥ धनासहवर्तमान उदकामध्यें अकस्मात मग्न जाहली नंतर कलावती आपला पति बुडाला हें पाहून ॥ २६ ॥ महान् शोक करून रूदन करीत होत्साती

व्रजामिशीघ्रमागच्छसाधुसंदर्शनायच ॥इतिमातृवचःश्रुत्वाव्रतंकृत्वासमाप्यच ॥ २४ ॥ प्रसादंचपरित्यज्यगतासापिपतिंप्रति ॥ तेन रुष्टःसत्यदेवोभर्त्तारंतरणींतथा ॥ २५ ॥ संहृत्यचधनैःसार्धंजलेतस्याअमज्जयत् ॥ ततःकलावतीकन्यानविलोक्यनिजंपतिं ॥ २६ ॥ शोकेनमहतातत्ररुदतीचापतद्भुवि ॥ दृष्ट्वातथाविधांनावंकन्यांचबहुदुःखिताम् ॥ २७ ॥ भीतेनमनसासाधुः किमाश्चर्यमिदंभवेत् ॥ चिंत्यमानाश्चतेसर्वेबभूवुस्तरि वाहकाः ॥ २८ ॥

भूमीवर पडली तेव्हां नाव बुडाली आणि कन्या बहुत दुःख करित्ये हें पाहून ॥ २७ ॥ साधुवाणीही मनांत भीती पावून ह्मणतो कीं, हें आश्चर्य काय जाहलें? तसेच ते नावाडीही चिंतायुक्त होते जहाले ॥ २८ ॥

नंतर लीलावती कन्येचें दुःख पाहून विव्हल होत्साती अत्यंत दुःखानें विलाप करून पतीप्रत भाषण करिती जाहली ॥ २९ ॥ आतांच नावेसहवर्तमान जामात कसा नष्ट जाहला, कोणत्या देवाचा अपराध जाहला ह्मणून नाव हरण केली हें समजत नाहीं ॥ ३० ॥ परंतु सत्यदेवाचें माहात्म्य जाणण्यास कोण सयर्थ आहे असें बोलून स्वजनांसहवर्तमान विलाप करूं लागली ॥ ३१ ॥ नंतर लीलावती,

ततोलीलावतीकन्यांदृष्ट्वासाविव्हलाऽभवत् ॥ विललापातिदुःखेतभर्तारंचेदमब्रवीत् ॥२९॥ इदानींनौकयासार्धंकथंसोऽभूदलक्षितः ॥ नजानेकस्यदेवस्यहेलयाचैवसाहृता ॥ ३० ॥ सत्यदेवस्यमाहात्म्यंज्ञातुंवाकेनशक्यते ॥ इत्युक्त्वाविललापैवततश्चस्वजनैःसह ॥ ३१ ॥ ततोलीलावतीकन्यांक्रोडेकृत्वारुरोदह ॥ ततःकलावतीकन्यानष्टेस्वामिनिदुःखिता ॥ ३२ ॥ गृहीत्वापादुकेतस्यानुगंतुंचमनोदधे ॥ कन्यायाश्चरितंदृष्ट्वासभयःसज्जनोवणिक् ॥ ३३ ॥

कन्येला आपल्याजवळ घेऊन रूदन करूं लागली. तेव्हां कलावती कन्या आपला स्वामी नष्ट जाहला या दुःखानें विव्हल जाहली ॥ ३२ ॥ नंतर कलावतीनें पतीच्या पादुका करून सहगमन करावें असा विचार केला. कन्येचें हें चरित्र साधुवैश्य स्त्रीसहवर्तमान पाहून ॥ ३३ ॥

अत्यंत शोकानें संतप्त होत्साता धर्मयुक्त दृष्टीनें विचार करून ह्मणतो कीं, सत्यदेवानें तर नौका हरण केली नसेल ना ? किंवा मीं तर सत्यदेवाचे मायेनें भ्रमिष्ठ जाहलों नाहीं ना ? ॥ ३४ ॥ असें मनांत आणून सर्वांस बोलावून, आपला मनोरथ सांगतो कीं, मी माझे ऐश्वर्याप्रमाणें सत्यनारायणाची पूजा करीन ॥ ३५ ॥ असें बोलून सत्यदेवाला वारंवार साष्टांग नमस्कार करिता जाहला. तेणेंकरून भग-

अतिशोकेनसंतप्तश्चिंतयामासधर्मवित् ॥ हृतंवासत्यदेवेनभ्रांतोऽहंसत्यमायया ॥ ३४ ॥ सत्यपूजांकरिष्यामियथाविभवविस्तरैः ॥ इतिसर्वान्समाहूयकथयित्वामनोरथम् ॥ ३५ ॥ नत्वाचदंडवद्भूमौसत्यदेवंपुनःपुनः ॥ ततस्तुष्टःसत्यदेवोदीनानांपरिपालकः ॥ ३६ ॥ जगादवचनंचैनंकृपयाभक्तवत्सलः॥त्यक्त्वाप्रसादंतेकन्यापतिंद्रष्टुंसमागता ॥ ३७ ॥

वान् तुष्ट जाहला, कारण दीनाचें पालन करणारा ॥ ३६ ॥ आणि भक्तवत्सल असा दयायुक्त भगवान् साधूप्रत आकाशवाणीनें सांगता जाहला कीं, तुझ्या कन्येनें पूजन केलें, परंतु प्रसाद न घेतां पतीला पाहण्याकरितां प्राप्त जाहली ॥ ३७ ॥

या कारणानें कन्येचा पति निश्चयेंकरून अदृष्ट जाहला आहे. तर ही गृहाप्रत जाऊन प्रसाद भक्षण करून जर येईल तर ॥ हे साधो, तुझे कन्येचा पति प्राप्त होईल यांत संशय नाहीं. अशी आकाश वाणी श्रवण करून ॥ ३९ ॥ ती कलावती कन्या शीघ्र गृहाप्रत जाऊन, प्रसाद भक्षण करून पुनः पूर्वस्थळीं येतांच स्वजन आणि पती यांस अवलोकन करिती जाहली ॥ ४० ॥ नंतर कलावती कन्या

अतोऽदृष्टोऽभवत्तस्याःकन्यकायाःपतिर्ध्रुवम् ॥गृहंगत्वाप्रसादंचभुक्त्वाचाया तिचेत्पुनः ॥ ३८ ॥ लब्धभर्त्रीसुतासाधोभविष्यतिनसंशयः ॥ कन्यकाताद्दृ शंवाक्यंश्रुत्वागगनमंडलात् ॥ ३९ ॥ क्षिप्रंतदागृहंगत्वाप्रसादंचबुभोजसा ॥ सापश्चात्पुनरागत्यददर्शस्वजनंपतिम् ॥ ४० ॥ ततःकलावतीकन्याजगाद पितरंप्रति ॥ इदानीचगृहंयाहिविलंबंकुरुषेकथम् ॥ ४१ ॥ तच्छ्रुत्वाकन्यका वाक्यंसंतुष्टोभूद्वणिक्सुतः ॥ पूजनंसत्यदेवस्यकृत्वाविधिविधानतः ॥ ४२ ॥

आपल्या पित्याला म्हणते कीं, हे पित्या, आतां लवकर घरीं चला विलंब कां करिता ? ॥ ४१ ॥ असें कन्येचें भाषण श्रवण करून साधुवैश्य संतुष्ट जाहला आणि यथाविधि सत्यनारायणाचें पूजन करून ॥ ४२ ॥

नंतर धन व बंधुगणासहवर्तमान आपल्या गृहाप्रत जाता जाहला आणि संक्रांतियुक्त पौर्णिमेचे ठाईं सत्यदेवाचें पूजन करिता जाहला ॥ ४३ ॥ या योगानें या लोकीं सर्व सुखोपभोग करून शेवटीं सत्य पुराप्रत गमन करिता जाहला ॥ इति श्रीस्कंदपुराणे रेवाखंडे सत्यनारायणव्रतकथायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ सूत ह्मणतात, ऋषिश्रेष्ठहो, आणखी तुह्मांला इतिहास सांगतों तो श्रवण करा. अंगध्वज ना

धनैर्बंधुगणैःसार्धंजगामनिजमंदिरं ॥ पौर्णमास्यांचसंक्रांतौकृतवान्सत्यपूजनम् ॥ ४३ ॥ इहलोकेसुखंभुक्त्वाचांतेसत्यपुरंययौ ॥ ४४ ॥ इतिश्रीस्कंदपुराणे रेवाखंडेसत्यनारायणव्रतकथायांचतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ सूत उवाच ॥ अथान्यच्चप्रवक्ष्यामिशृणुध्वंमुनिसत्तमाः ॥ आसीदंगध्वजोराजाप्रजापालनतत्परः ॥ १ ॥ प्रसादंसत्यदेवस्यत्यक्त्वादुःखमवापसः ॥ एकदासवनंगत्वाहत्वाबहुविधान्पशून् ॥ २ ॥

मक राजा होता तो प्रजेचें पालन करण्याविषयीं तत्पर असे ॥ १ ॥ त्या राजानें सत्यदेवाच्या प्रसादा चा त्याग केला त्या योगानें दुःख प्राप्त जाहलें. तें असें कीं, कोणे एके समयीं वनाप्रत जाऊन अनेक प्रकारचे पशु मारून ॥ २ ॥

वट वृक्षाखालीं प्राप्त जाहला नंतर तेथें गोप बांधव सहवर्तमान आनंदानें भक्तियुक्त होत्साते सत्यदेवाचें पूजन करीत होते हें राजानें पाहिलें ॥ ३ ॥ परंतु गर्वानें तेथें गेला नाहीं व देवतेला नमस्कारही केला नाहीं. नंतर सर्व गोपगणांनीं प्रसाद राजाजवळ आणून ठेविला ॥ ४ ॥ आणि पुनः आपल्या ठिकाणीं येऊन सर्वांनीं येथेष्ट भोजन केलें. राजा प्रसादाचा त्याग करून गेला, त्या योगानें त्याला

आगत्य वटमूलंचदृष्ट्वासत्यस्यपूजनम् ॥ गोपाःकुर्वंतिसंतुष्टाभक्तियुक्ताःसबांधवाः ॥ ३ ॥ राजादृष्ट्वातुदर्पेणनगत्वाननमामसः ॥ ततोगोपगणाःसर्वेप्रसादंनृपसंनिधौ ॥ ४ ॥ संस्थाप्यपुनरागत्यभुक्त्वासर्वेयथेप्सितम् ॥ ततःप्रसादंसंत्यज्यराजादुःखमवापसः ॥ ५ ॥ तस्यपुत्रशतंनष्टंधनधान्यादिकंचयत् ॥ सत्यदेवेनतत्सर्वंनाशितंममनिश्चितम् ॥ ६ ॥ अतस्तत्रैवगच्छामियत्रदेवस्यपूजनम् ॥ मनसातुविनिश्चित्यययौगोपालसंनिधौ ॥ ७ ॥

दुःख प्राप्त जाहलें ॥ ५ ॥ तें कोणतें? तर राजाचे शंभर पुत्र नाश पावले आणि धनधान्याचा नाश जाहला. असा एकाएकीं नाश होतांच राजाला वाटलें कीं, सत्यदेवानें माझा सर्वस्वी नाश केला. याविषयीं निःसंशय होऊन ॥ ६ ॥ ह्मणाला कीं, ज्या ठिकाणीं गोपांनीं देवाचें पूजन केलें तेथेंच जाऊन मी पूजन करीन. असा मनाचा निश्चय करून गोपाळांजवळ जाता जाहला ॥ ७ ॥

नंतर राचा गोपागणांसहवर्तमान भक्तिश्रद्धायुक्त होत्साता सत्यनारायणाची पूजा यथाशास्त्र करिता जाहला ॥ ८ ॥ नंतर सत्यदेवाचे प्रसादेंकरून धनपुत्रादिकांनीं युक्त होत्साता या लोकीं सर्व सुखोपभोग करून, अंतकालीं सत्यपुराप्रत गमन करिता जाहला ॥ ९ ॥ तस्मात हे ऋषीहो, असें परम दुर्लभ सत्यनारायणाचें व्रत जो कोणी करितो, अथवा भक्तीनें पुण्यकारक कथा जो कोणी

ततोऽसौसत्यदेवस्यपूजांगोपगणैःसह ॥ भक्तिश्रद्धान्वितोभूत्वाचकारविधिनानृपः ॥ ८ ॥ सत्यदेवप्रसादेनधनपुत्रान्वितोभवत् ॥ इहलोकेसुखंभुक्त्वाचांतेसत्यपूरंययौ ॥ ९ ॥ यइदंकुरुतेसत्यव्रतंपरमदुर्लभम् ॥ शृणोतिचकथांपुण्यांभक्तियुक्तःफलप्रदाम् ॥ १० ॥ धनधान्यादिकंतस्यभवेत्सत्यप्रसादतः ॥ दरिद्रोलभतेवित्तंबद्धोमुच्येतबंधनात् ॥ ११ ॥ भीतोभयात्प्रमुच्येतसत्यमेवनसंशयः ॥ ईप्सितंचफलंभुक्त्वाचांतेसत्यपुरंव्रजेत् ॥ १२ ॥

श्रवण करितो, त्याला फळ प्राप्त होतें ॥ १० ॥ सत्यदेवाचे प्रसादेंकरून त्या मनुष्याला धनधान्यादिकांची प्राप्ति होते. दरिद्री आहे त्याला धन प्राप्ति होते. जो बद्ध आहे तो बंधनापासून मुक्त होतो. ॥ ११ ॥ ज्याला भीति उत्पन्न जाहली तो भयापासून मुक्त होतो यांत संशय नाहीं आणि जें इच्छित तें फल प्राप्त होऊन अंतीं सत्यपुराप्रत जातो ॥ १२ ॥

50483

सूत ह्मणतात, ऋषीहो, या प्रकारेंकरून तुह्मांला सत्यनारायणाचें व्रत सांगितलें हें व्रत जो मनुष्य करितो तो सर्व दुःखापासून मुक्त होतो ॥ १३ ॥विशेषेंकरून कलियुगामध्यें सत्यदेवाची पूजा तत्काल फल देणारी आहे. कितीएक लोक याच सत्यनारायणाला काल, सत्यदेव व ईश असें ह्मणतील ॥१४॥ कोणी सत्यनारायण, कोणी सत्यदेव, असें ह्मणतील. परंतु भगवान् नानाप्रकारचीं रूपें धारण

इतिवःकथितंविप्राःसत्यनारायणव्रतम् ॥ यत्कृत्वासर्वदुःखेभ्योमुक्तोभवतिमानवः ॥ १३ ॥ विशेषतःकलियुगेसत्यपूजाफलप्रदा ॥ केचित्कालंवदिष्यंतिसत्यमीशंतमेवच ॥ १४ ॥ सत्यनारायणंकेचिसत्सत्यदेवंतथापरे॥ नानारूपधरोभूत्वासर्वेषामीप्सितप्रदः॥१५॥भविष्यतिकलौसत्यव्रतरूपीसनातनः॥यइदंपठतेनित्यंशृणोतिमुनिसत्तमाः ॥ सत्यंनश्यंतिपापानिसत्यदेवप्रसादतः ॥१६॥

करून सर्वांचें इच्छित पूर्ण करील ॥ १५ ॥ असा भगवान् या कलियुगांत सनातन ह्मणजे चिरकाल व्रतरूपी असा होईल. जो ही कथा पठण करील अथवा श्रवण करील त्याचीं सत्यदेवाचे प्रसादेंकरून सर्व पातकें नाश होऊन मनोरथ पूर्ण होतील. असें सूत शौनकादि ऋषींप्रत सांगते जाहले ती कथा यथामत्या निवेदन केली ॥ १६ ॥

इति श्रीस्कंदपुराणेरेवाखंडेसत्यनारायणव्रतकथायांपंचमोऽध्यायः समाप्तः ॥ ५ ॥ सत्यनारायणकथासमाप्ता ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

इति श्रीस्कंदपुराणे रेवाखंडे सत्यनारायणकथायां पंचमोऽध्यायः समाप्तः ॥ ५ ॥

सत्यनारायणकथा समाप्त.

श्रीसत्यनारायणपूजेचेंसाहित्य.

तांब्या १, ताम्हन, १ तांदूळ अर्धशेर, केळीचे खांब च्यार, गंध, पुष्प अक्षता, धूप दीप, हळद कुंकु, गुलाल, साखर, विड्याचीं पानें २५, सुपाऱ्या ५०, खोबऱ्याची वाटी, बदाम २, खारका ३, नारळ १. दूर्वा पंच पल्लव, रांगोळी, पाट, सखलाद, कापूर, बुक्का, सुगंधी तेल, ऊन पाणी, अरगजा, पंचामृत साहित्य दूध, दहीं, तूप, मध, साखर, नैवेद्यास (तूप साखर, गव्हाचा रवा, दुध हीं सर्व सवाशेर वजनाचीं धरावीं. शिवाय त्याजवर सवाशेर केळीं टाकावीं. व वेलदोडे घालावे) महानैवेद्य अन्नाचा, पूर्वपूजा व उत्तरपूजा वगैरे ठिकाणीं एकंदर खुर्दा आठ आणे व पुराणिकास आठ आणे भूयसी शक्ती प्रमाणें असावी.

प्रसादाचें सामान.

सवाईचे मानानें असावें.

तूप. साखर. रवा. दूध. केळीं.

हें पुस्तक
पुरंदरे आणि कंपनी यांणीं
" ज्यूबिली " प्रिंटिंग प्रेस मध्यें छापून प्रसिद्ध केलें.
शके १८१८, सन १८९६. तारिख ५ माहे जूलै.
(सर्व हक्क प्रसिद्ध कर्त्यांनीं ठेविला आहे)

॥ इति सत्यनारायणपूजासार्थकथा स० ॥

WOMEN'S
LIBRARY

AUTHOR

TITLE

VSa 294.5
Sat
50483

Date Due